JUNIPER HOTELS

**JHL/SJ/2024/28** **June 04, 2024**

| National Stock Exchange of India Limited<br>Exchange Plaza,<br>Bandra Kurla Complex,<br>Bandra (East),<br>Mumbai - 400 051 | BSE Limited,<br>Corporate Relationship Department<br>Phiroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street, Fort,<br>Mumbai - 400 001 |
|---|---|
| **Symbol: JUNIPER** | **Scrip Code: 544129** |

**Sub.: Intimation of Newspaper Advertisements for Postal Ballot Notice**

**Ref.: Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

Dear Sir/ Madam,

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith the copies of Newspaper Advertisements pertaining to confirmation of the dispatch of Postal Ballot Notice dated June 03, 2024 published in today's edition i.e. Financial Express (English) and Loksatta (Marathi).

The aforesaid Newspaper Publication is also available on Company's website at www.juniperhotels.com.

You are kindly requested to take the same on your records.

Thanking you,

**For Juniper Hotels Limited**

Sandeep Laxmikant Joshi
Digitally signed by Sandeep Laxmikant Joshi
Date: 2024.06.04 13:01:58 +05'30'

**Sandeep L. Joshi**
**Company Secretary and Compliance Officer**

Encl: a/a

# आले चघळल्याने हृदयविकाराचा धक्का टळण्यास मदत?

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** एखाद्या व्यक्तीला श्वास घेण्यास त्रास होत असेल तर त्याला तत्काळ 'सीपीआर' (कार्डिओ पल्मोनरी रिलक्सीएशन) देणे आवश्यक ठरते. आपण ॲस्पिरिनबद्दल (वेदनाशामक औषध) नेहमीच ऐकतो. परंतु हृदयविकाराचा झटका आल्यास आले (अद्रक) चघळण्याबद्दल कधी ऐकलेले नाही. याबाबत प्रसिद्ध आयुर्वेद अभ्यासकांनी आल्याचा तुकडा चघळल्याने अचानक हृदयविकाराचा धक्का टाळण्यास मदत होते, असे सुचवले. या दाव्याची पडताळणी केल्यानंतर आरोग्य तज्ज्ञांनीही याला दुजोरा दिला.

तीव्र हृदयविकाराच्या झटक्याला एसटी-सेगमेंट एलिव्हेशन मायोकार्डियल इन्फेक्शन (स्टेमी) असे म्हणतात. जेव्हा एक प्रमुख हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमनी पूर्णपणे ब्लॉक होतात, तेव्हा हृदयविकाराचा झटका येतो. राष्ट्रीय जैवतंत्रज्ञान माहिती केंद्राच्या मते हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमण्यांमध्ये अडथळे आल्यानंतर 'स्टेमी'चा प्रादुर्भाव होतो. त्यातून थेट मृत्यूही संभवतो. राष्ट्रीय जैवतंत्रज्ञान माहिती केंद्राच्या (एनसीबीआय) संशोधनानुसार, आल्यामध्ये अनेक नैसर्गिक घटकांचा समावेश असतो. त्याचा अन्नपदार्थांमध्ये दैनंदिन वापरही मोठ्या प्रमाणात होतो.

आल्यामध्ये अनेक प्रतिजैविक गुणधर्म असतात. परंतु हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामध्ये आले चघळण्याच्या परिणामकारकतेचा कोणताही संशोधन-आधारित पुरावा नाही. म्हणून त्याऐवजी हृदयविकाराचा झटका आल्यानंतर ॲस्पिरिनची गोळी घेतल्याने पुढी धोका टाळता येतो.



100% Ayurvedic FDA APPROVED
काही खाल्लं की पोट जड होतंय? गॅसेस? पोट नीट साफ होत नाही?
तन्वीशता 9769695892
आरोग्यसल्ला 9820075812
रोज रात्री गरम पाण्यासोबत घ्या २ तन्वीत्रिफळा + १ वातशांती
Tanvi HERBALS
केमिस्टकडे उपलब्ध




पुणे पोर्श अपघात

## अल्पवयीन आरोपीची व्यसनमुक्ती केंद्रात रवानगी

**पुणे :** कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला व्यसनांपासून मुक्त करण्यासाठी बाल न्याय मंडळाने त्याला व्यसनमुक्ती केंद्रात पाठविण्याचे आदेश दिले आहेत. त्याला आणखी काही दिवस बालसुधारगृहात ठेवावे, असा अर्ज पोलिसांकडून दाखल केला जाण्याची शक्यता आहे.

कल्याणीनगर परिसरात १९ मे रोजी भरधाव मोटारीने धडक दिल्याने दुचाकीवर स्वार असलेल्या दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. या प्रकरणात अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे.

**बालसुधारगृहानंतर पुढे काय?**

मुलाला ५ जूनपर्यंत बालसुधारगृहात ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुलाची मुक्तता झाल्यानंतर त्याचा ताबा कोणाकडे द्यायचा, त्यांची नावे द्यावीत, अशी सूचना मंडळाने मुलाच्या वकिलांकडे केली आहे. मुलाचा रक्ताच्या नात्यातील सदस्यांकडे ताबा देता येणार नाही. त्यामुळे त्रयस्थ व्यक्तीची नावे द्यावीत, असे मंडळाने आदेशात म्हटले आहे. मात्र, अद्याप ही नावे मंडळात सादर करण्यात आलेली नाहीत.

# तीन अपघातांत नऊ ठार

## कोल्हापुरात मोटारची वाहनांना धडक | वाशीममध्ये 'समृद्धी'वर मोटार-ट्रकची टक्कर | सोलापुरात मोटार धडकल्याने दुचाकीवरील तिघांचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर/सोलापूर/वाशीम :** राज्यात एकाच दिवशी झालेल्या तीन अपघातांत नऊ जणांचा मृत्यू झाला. कोल्हापुरात मोटारीने अनेक वाहनांना धडक दिली. यात मोटारचालक व शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण यांच्यासह तिघांचा मृत्यू झाला. वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर मोटारीने ट्रकला टक्कर दिल्यामुळे तिघे दगावले, तर सोलापुरात रविवारी रात्री उशीरा मोटारीने धडक दिल्यामुळे दुचाकीवरील तिघे मृत्युमुखी पडले.

कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाजवळील अत्यंत वर्दळीच्या सायबर चौकात चव्हाण यांचे मोटारीवरील नियंत्रण सुटले. त्यांच्या मोटारीने आठ प्रवासी असलेल्या चार दुचाकींना उडवले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, धडक एवढी भीषण होती, की दुचाकीवरील चौघे दूरवर उडाले व इतर चौघे मोटारीसह फरफटत गेले. अपघातात हर्षद पाटील (१६, रा. दौलतनगर) व अनिकेत चौगुले (२४, रा. आसुर्ले पोर्ले) यांचा मृत्यू झाला. जखमींवर सिटी रुग्णालयात व सीपीआर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चव्हाण यांचाही अपघातावेळी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची माहिती आहे.

समृद्धी महामार्गावरून संभाजीनगरकडून अमरावतीकडे जाणाऱ्या मोटारीने ट्रकला जोरदार धडक दिली. रिधोरा इंटरचेंजजवळ सोमवारी सकाळी ही दुर्घटना घडली. यात कारमधील सादल काजी, आलम हुसेन (कर अधिकारी) हे जागीच दगावले, तर आरिफ खान यांचा मालेगाव ग्रामीण रुग्णालय उपचारादरम्यान मृत्यू झाला. चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर-सांगोला रस्त्यावर रविवारी रात्री मोटारीने कवठेमहांकाळ येथे बीरूदेवाच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या दुचाकीला धडक दिली. यात बीरू नवलाप्पा कोळेकर (२२), विठ्ठल बीरू दिवटे (१७) आणि म्हाळप्पा महादेव धनगर (१७) यांचा मृत्यू झाला. तिघेही बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी तालुक्यातील रहिवासी आहेत. सांगोला पोलिसांनी मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



### शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा

कोल्हापूरच्या अपघातात शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण यांचा अपघाती मृत्यू झाल्याने शैक्षणिक क्षेत्राला धक्का बसला. प्रभारी कुलगुरू व प्र - कुलगुरू पदावर त्यांनी काम केले होते. ते दीड वर्ष प्राचार्य होते. भारती विद्यापीठामध्ये संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये त्यांनी विविध पदे भूषविली.

**कोल्हापूरमधील वर्दळीच्या सायबर चौकात झालेल्या अपघातात मोटारीचा चक्काचूर झाला. ही दुर्घटना एवढी भीषण होती, की चौकातील लोखंडी तटबंदी उद्ध्वस्त झाली.**



**चालकाला डुलकी लागल्याने वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर मोटारीने ट्रकला धडक दिली.**

# मराठा आंदोलनात कुणाचा खोडा?

## ग्रामस्थांच्या विरोधानंतर जरांगे यांचे सत्ताधाऱ्यांकडे बोट


**लोकसत्ता वार्ताहर**

जालना : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना आंतरवली सराटी या मूळ गावी आंदोलनास परवानगी देऊ नये, अशी भूमिका काही ग्रामस्थांनी घेतली आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तशी लेखी मागणी केली आहे. यामागे कोण असा प्रश्न उपस्थित होत असताना जरांगे यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बोट दाखविले.

आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे आज, मंगळवारपासून आंतरवली सराटीमध्ये पुन्हा उपोषण करणार आहेत. या पार्श्वभूमीवर गावात आंदोलनास परवानगी देऊ नये, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

> एकाच गावाने आंदोलनाचा ताण किती दिवस सहन करायचा? पावसाळा जवळ आल्याने हे कामाचे दिवस आहेत. त्यामुळे जरांगे-पाटील यांनी आंदोलनाचे स्थळ वडिगोद्री किंवा आसपासच्या गावांत हलवावे. – **किरण तारख**, ग्रामस्थ

> कोणी किती फोडाफोडी केली, तरी त्याला यश येणार नाही. आम्हाला आरक्षण हवे आहे. आमच्या आंदोलनात काड्या करू नये, नाहीतर विधानसभा निवडणुकीत २८८ जागांवर उमेदवार उभे करू. – **मनोज जरांगे**, मराठा आरक्षण आंदोलक



# महायुतीत कुरघोड्यांचे राजकारण

*(पान १ वरून)* म्हणून शिंदे गटाने लगेचच भाजपचे निरंजन डावखरे उमेदवार असलेल्या कोकण पदवीधर मतदारसंघातून उमेदवार उभा करण्याचा इशारा दिला. ठाण्याचे माजी महापौर संजय मोरे यांनी उमेदवारी अर्ज निवडणूक कार्यालयात घेतल्याची माहिती पसरविण्यात आली. मुंबईची जागा लढविण्यास भाजप ठाम असल्यास कोकण पदवीधर मतदारसंघात शिंदे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तयारी सुरू झाली आहे. मुंबई पदवीधवरवरून भाजप आणि शिंदे गटाकडून शह-काटशहा देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

मुंबई पदवीधर मतदारसंघात शिंदे गटाकडून माजी मंत्री डॉ. दीपक सावंत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपचा आमदार असला तरी महायुतीला लोकसभा निवडणुकीत बिनशर्त पाठिंबा दिलेल्या मनसेने उमेदवार उभा केला आहे. मनसेने उमेदवार उभा केला असतानाच शिंदे गटाने संजय मोरे यांना उमेदवारी उर्ज दाखल केल्यास भाजपचे निरंजन डावखरे यांच्यासमोर आव्हान उभे राहू शकते. नाशिक शिक्षक मतदारसंघातून विद्यमान आमदार किशोर दराडे यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. मात्र राजेंद्र विखे-पाटील यांनीही अपक्ष अर्ज दाखल केला आहे. दरम्यान, मुंबई पदवीधरसाठी ठाकरे गटाचे उमेदवार अनिल परब आणि शिक्षक मतदारसंघासाठी ज. मो. अभ्यंकर यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केले.

# 'कौशल्य विकास' अभ्यासक्रम व संधींबाबत मार्गदर्शन

*(पान १ वरून)* ठिकाणी तरुण पिढीला 'कौशल्य विकास प्रशिक्षणा'चे महत्त्व पटवून दिले जात असून त्या अनुषंगाने विविध उपक्रमही राबविले जात आहेत. या पार्श्वभूमीवर दहावी, बारावी, पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांनंतर कौशल्य विकास क्षेत्रासंबंधित अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना 'लोकसत्ता मार्ग यशाचा' कार्यशाळेत थेट तज्ज्ञांकडून जाणून घेता येणार आहे. करिअरच्या संधींबाबत विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनाही चिंता सतावू लागते. या गोंधळलेल्या मनःस्थितीतून बाहेर कसे पडावे आणि ताणतणावाचे नियोजन कसे करावे, याबाबत डॉ. हरीश शेट्टी (८ जून) व डॉ. राजेंद्र बर्वे (९ जून) संवाद साधणार आहेत. स्पर्धात्मक काळात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या 'यूट्यूब - समाजमाध्यमे' या विषयावर केतन जोशी, वित्तक्षेत्रातील संधींबाबत कौस्तुभ जोशी आणि 'एआय' - कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत डॉ. भूषण केळकर मार्गदर्शन करतील. नवनवीन अभ्यासक्रम व विविध क्षेत्रांतील करिअरच्या संधींचा विवेक वेलणकर मागोवा घेतील. तर परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधींबाबत बख्तावर कृष्णन व तरंग अग्रवाल संवाद साधतील.

करिअरच्या विविध संधींचा भविष्यवेध घेणाऱ्या 'लोकसत्ता मार्ग यशाचा' या कार्यशाळेत दोन्ही दिवस सारख्याच विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. यामुळे विद्यार्थी व पालक त्यांच्या सोयीनुसार कोणत्याही एका दिवसाची निवड करू शकतात. सदर कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच ऑनलाइन व प्रत्यक्ष पद्धतीने प्रवेशिका आरक्षित करण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कार्यशाळेसाठी प्रवेश शुल्क अवघे ५० रुपये आहे.


LTIMindtree

**एलटीआयमाइंडट्री लिमिटेड**

(लार्सन ॲण्ड टूब्रो इन्फोटेक लिमिटेड म्हणून पूर्वज्ञात)

**सीआयएन:** L72900MH1996PLC104693

**नोंदणीकृत कार्यालय:** एल ॲण्ड टी हाऊस, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१, भारत

**दू. क्र.:** +९१ २२ ६७७६ ६७७६; **फॅक्स क्र.:** +९१ २२ ४३१३ ०९९७

**ई-मेल:** investor@ltimindtree.com; **संकेतस्थळ:** www.ltimindtree.com

**२८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदानाची माहिती**

याद्वारे सूचना देण्यात येते की, एलटीआयमाइंडट्री लिमिटेडची **अठ्ठावीसावी (२८ वी)** वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार, २६ जून, २०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता (भा.प्र.वे.)**, कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') अंतर्गत निर्मित नियमांसहवाचीत आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे सदर विषयावर वितरीत अगोदरच्या परिपत्रकासहवाचित २५ सप्टेंबर, २०२३ दिनांकित सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०९/२०२३ (''एमसीए परिपत्रक'') आणि या विषयावर सेबीद्वारे वितरीत अगोदरच्या परिपत्रकांसह वाचित ०७ ऑक्टोबर, २०२३ दिनांकित सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2023/167 सहवाचित सेबी (सुचिबध्दता बंधन आणि प्रकटन आवश्यकता) विनियम, २०१५ (''सेबी सुचिबध्दता विनियम'') च्या प्रयोज्य तरतूदींच्या अनुपालनासह, कंपनीच्या २८व्या एजीएमच्या सूचनेमध्ये ('**एजीएम सूचना**') नमूद कामकाजाच्या निष्पादनासाठी व्हीडीयो कॉन्फरन्सींग (व्हीसी)/अन्य ऑडीयो व्हीज्यूअल (ओएव्हीएम)साधनांद्वारे संपन्न होईल.

**एजीएम सूचना आणि वित्तीय वर्ष-२४ च्या एकत्रीकृत वार्षिक अहवालाचा बटवडा पूर्ण झाला:** एमसीए परिपत्रक आणि सेबी परिपत्रकांच्या अनुपालनामध्ये, ज्या सभासदांनी कंपनी/डिपॉजिटरी पार्टीसीपंट्स आणि/किंवा कंपनीच्या निबंधक आणि भाग हस्तांतर एजंट म्हणजे लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे आपले ई-मेल आयडी नोंदविले आहेत त्यांना कंपनीद्वारे एजीएम सूचना आणि वित्तीय वर्ष-२४ चा एकत्रीकृत वार्षिक अहवाल, सोमवार, ०३ जून, २०२४ रोजी ई-मेलद्वारे पाठविण्यात आला आहे.

एजीएम सूचना आणि एकत्रीकृत वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळ: https://www.ltimindtree.com/investors/, नॅशनल सिक्यूरिटीज डीपॉजीटरी लिमिटेडच्या ('एनएसडीएल') संकेतस्थळ: https://evoting.nsdl.com/, आणि तसेच स्टॉक एक्सचेंजेसच्या म्हणजे बीएसई लिमिटेडच्या: https://www.bseindia.com/ आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळ: https://www.nseindia.com/ वरही उपलब्ध आहे.

**दस्तावेजांचे निरीक्षण:** एजीएम सूचनेच्या संदर्भातील सर्व दस्तावेज रिमोट ई-व्होटींग दरम्यान आणि २८ व्या एजीएम दरम्यान https://www.evoting.nsdl.com येथील एनएसडीएल मंचावर जाऊन सभासदांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध असतील.

**ई-व्होटींग:** कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) अधिनियम, २०१४ च्या नियम २० सहवाचित कायद्याच्या सेक्शन १०८ च्या तरतूदी, आणि सुचिबध्दता विनियमाच्या विनियम ४४ व इन्स्टीट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाद्वारे वितरीत सर्वसाधारण सभेवरील सेक्रेटरीयल स्टॅंडर्ड-२ अनुसार, सभासदांना एनएसडीएलद्वारे पुरविण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा (ई-व्होटींग) वापर करून एजीएम सूचनेमध्ये नमूद सर्व ठरावांवर त्यांचे मतदान करण्यासाठी सुविधा पुरविण्यात आली आहे. कंपनीच्या रजिस्टरमध्ये किंवा डीपॉजीटरीजद्वारे परिरक्षीत लाभधारक मालकांच्या रजिस्टरमध्ये **बुधवार, १९ जून, २०२४ (''कट-ऑफ दिनांक'')** रोजी ज्यांचे नाव अभिलेखीत आहे, ते रिमोट ई-व्होटींगद्वारे किंवा एजीएम दरम्यान ई-व्होटींगद्वारे त्यांचे मतदान करण्यासाठी पात्र राहतील. सभासदांचा मतदान अधिकार कट-ऑफ दिनांक रोजी कंपनीच्या एकूण संपूर्ण भरणा झालेल्या भाग भांडवलातील त्यांच्या शेअर धारणेच्या प्रमाणामध्ये असेल. सभासदाने एकदा मतदान केल्यावर, त्याला/तिला ते नंतर बदलता येणार नाही. सभासद मतदानाचा केवळ एक पर्याय स्वीकारू शकतील म्हणजे रिमोट ई-व्होटींग किंवा २८ व्या एजीएममध्ये ई-व्होटींगचा पर्याय. सभासदांनी दोन्ही पध्दतीने मतदान केल्यास, रिमोट ई-व्होटींगद्वारे केलेले मतदान ग्राह्य मानण्यात येईल. रिमोट ई-व्होटींग किंवा एजीएम दरम्यान ई-व्होटींगसाठी आणि एजीएममध्ये भाग घेण्यासाठी सविस्तर प्रक्रिया एजीएम सूचनेच्या परिशिष्ट मध्ये उदृत करण्यात आली आहे. रिमोट ई-व्होटींगचा कालावधी शनिवार, २२ जून, २०२४ रोजी स. ९:०० (भाप्रवे) (सर्व्हर टाईम) सुरू होईल आणि मंगळवार २५ जून, २०२४ रोजी सायं. ५:०० वा. (भाप्रवे) (सर्व्हर टाईम) समाप्त होईल. त्यानंतर, रिमोट ई-व्होटींग मॉड्यूल एनएसडीएलकडून निष्क्रीय करण्यात येईल, आणि सभासदांना मतदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. ज्या सभासदांनी त्यांचा मतदानाचा अधिकार रिमोट ई-व्होटींगद्वारे बजावला आहे त्यांना एजीएममध्ये उपस्थित राहता येईल परंतू पुन्हा मतदान करण्यासाठी ते पात्र नसतील. कोणतीही व्यक्ती एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष-२४ करता एकत्रीकृत वार्षिक अहवाल पाठवल्यानंतर सभासद झाली आहे आणि कट-ऑफ तारखेला समभाग धारण करीत असेल, त्यांनी एजीएममध्ये उपस्थित राहण्यासाठी आणि ई-मतदानासाठी युजर आयडी आणि पासवर्ड कार्यान्वयनासाठी आणि ई-मेल आयडी नोंदविण्यासाठी एजीएम सूचनेमधील परिशिष्ट मध्ये नमूद प्रक्रिया पहावी. सभासद रिमोट ई-व्होटींगसाठी एनएसडीएलसोबत अगोदरच नोंदणीकृत असल्यास, मतदान करण्यासाठी तो/ती विद्यमान अधिकारपत्रांचा वापर करू शकते.

**लाभांश:** संचालक मंडळाने त्यांच्या २४ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या सभेमध्ये भा. रू. १/- दर्शनिमूल्याच्या प्रत्येक समभागावर भा. रु. ४५/- च्या अंतिम लाभांशाची शिफारस केली आहे. २८ व्या एजीएममध्ये मंजूर झाल्यास, अंतिम लाभांश अदा करण्याच्या कारणासाठी **अभिलेखन दिनांक बुधवार १९ जून, २०२४** निश्चित करण्यात आली आहे. दिलेल्या लाभांशावरील टीडीएस संबंधीत सूचनांसाठी, सभासदांनी एजीएम सूचनेचे परिशिष्ट पहावे.

ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते आणि किंवा बँक खात्याचा तपशील नोंद / अद्ययावत केलेला नाही त्यांनी कृपया तो जसे प्रकरण असेल त्यानुसार, खालील शिष्टाचारांचे अनुसरण करून कंपनी/डीपॉजीटरीजच्या अभिलेखामध्ये नोंद / अद्ययावत करावेत.

| | |
|---|---|
| **डीमॅट प्रारूपामध्ये शेअर्स धारण केलेले सभासद** | त्यांच्या संबंधीत डीपॉजीटरी पार्टीसीपंट (डीपी) मार्फत |
| **भौतिक प्रारूपामध्ये शेअर्स धारण केलेले सभासद** | कंपनीच्या आरटीए अर्थात लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमार्फत |

**निरीक्षणक:** कंपनीने रिमोट ई-व्होटींग तसेच एजीएममध्ये ई-व्होटींग प्रक्रियेच्या निष्पक्ष आणि पारदर्शक पध्दतीने निरीक्षणासाठी, निरीक्षक म्हणून श्रीमती कृपा जोईसर, प्रॅक्टीसींग कंपनी सेक्रेटरी (आयसीएसआय मेंबरशीप क्र. एफ ११११७ आणि सीओपी क्र. १५२६३) यांची नियुक्ती केली आहे.

ई-व्होटींग संबंधीत कोणत्याही विचारणांसाठी, सभासदांनी www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शनवर उपलब्ध फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यूज) आणि ई-व्होटींग युजर मॅन्यूअल पहावे किंवा ०२२-४८८६ ७००० वर संपर्क करावा किंवा श्रीमती रिंपा बाग, यांच्या evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवावी.

**एलटीआयमाइंडट्री लिमिटेड करता**
**अंगना अरोरा**
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

दिनांक: ३ जून, २०२४
स्थळ: मुंबई



पंजाब नैशनल बैंक punjab national bank

**निष्क्रिय/परिचालित न केली जाणारी खाती बंद करण्यासाठी जाहीर नोटीस**

बँकेच्या निदर्शनास आले आहे की, अनेक खात्यांमध्ये गेल्या ३ वर्षांपासून ग्राहकांकडून कोणतेही ऑपरेशन होत नाही आणि या खात्यांमध्ये शिल्लक ही नाही. या खात्यांचा गैरवापर होऊ नये, यासाठी बँकेने ही खाती बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

यद्यपि वृत्तपत्रांमध्ये दिनांक ०९.०५.२०२४, १८.०५.२०२४ आणि २४.०५.२०२४ च्या नोटिसा, बँकेच्या संकेतस्थळावर दिनांक ०१.०५.२०२४, १६.०५.२०२४ आणि २४.०५.२०२४ च्या नोटिसा आणि दिनांक ०६.०५.२०२४, १६.०५.२०२४ आणि २४.०५.२०२४ रोजी च्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. खातेदाराने संबंधित शाखेत केवायसी कागदपत्रे सादर करून खाते सक्रिय केल्याशिवाय पुढील सूचना न देता ही खाती एक महिन्यानंतर बंद केली जातील.

ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी बँकेने १५.०६.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा सर्व खातेदारांना पुन्हा विनंती आहे की त्यांनी १५.०६.२०२४ पर्यंत किंवा त्यापूर्वी आपले खाते पुन्हा सक्रिय करावे जेणेकरून ते बँकेत अखंडित बँकिंग सेवांचा लाभ घेऊ शकतील. १५.०६.२०२४ पर्यंत संबंधित शाखेत केवायसी कागदपत्रे सादर करून खाते सक्रिय केल्याशिवाय पुढील सूचना न देता ही खाती १६.०६.२०२४ रोजी किंवा त्यानंतर बंद केली जातील.

डीमॅट खात्यांशी संबंधित खाती, लॉकर, सक्रिय स्टॅंडिंग इन्स्ट्रक्शन दिलेली खाती, २५ वर्षांपेक्षा कमी वयाची विद्यार्थी खाती, अल्पवयीन मुलांची खाती, पीएमजेजेबीवाय / पीएमएसबीवाय / एसएसवाय / एपीवाय, डीबीटी सारख्या विशिष्ट कारणासाठी उघडलेली खाती आणि न्यायालय, आयकर विभाग किंवा इतर कोणत्याही वैधानिक प्राधिकरणांच्या आदेशाने गोठवलेली खाती या प्रक्रियेअंतर्गत बंद केली जाणार नाहीत.

काही प्रश्न / मदत असल्यास, आपण आपल्या शाखेशी संपर्क साधावा असे आवाहन केले जाते.

अधिकृत स्वाक्षरीकर्ता



JUNIPER HOTELS

**JUNIPER HOTELS LIMITED**

**(Formerly known as Juniper Hotels Private Limited)**

**CIN:** U55101MH1985PLC152863

**Registered Office:** Off Western Express Highway, Santacruz (East), Mumbai, Maharashtra - 400055, India

**Tel.:** 022-66761000/1012, **Website:** www.juniperhotels.com

**NOTICE OF POSTAL BALLOT**

Members are hereby informed that pursuant to the provisions of Section 108 and Section 110, and other applicable provisions of the Companies Act, 2013, as amended (the "Act"), read together with the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended (the "Management Rules"), General Circular Nos. 14/2020 dated April 8, 2020, 17/2020 dated April 13, 2020, 20/2020 dated May 5, 2020, 22/2020 dated June 15, 2020, 33/2020 dated September 28, 2020, 39/2020 dated December 31, 2020, 10/2021 dated June 23, 2021, 20/2021 dated December 8, 2021, 3/2022 dated May 5, 2022, 11/2022 dated December 28, 2022 and 09/2023 dated September 25, 2023, issued by the Ministry of Corporate Affairs, Government of India (the "MCA Circulars"), Secretarial Standard on General Meetings issued by the Institute of Company Secretaries of India ("SS-2") and any other applicable law, rules and regulations (including any statutory modification(s) or re-enactment(s) thereof, for the time being in force), the approval of members of Juniper Hotels Limited (the "**Company**") is sought for the following special resolution by way of remote e-voting ("e-voting") process:

1. To approve borrowing limits of the Company under section 180 (1)(c) of the Companies Act, 2013 and Creation of Charge/Security under section 180(1)(a) of the Companies Act, 2013

Pursuant to the MCA circulars, the Company has completed the dispatch of electronic copies of the Postal Ballot Notice along with the explanatory statement on Monday, June 03, 2024, through electronic mode to those Members whose email addresses are registered with the Company/ Depository Participant(s) as on May 24, 2024 ("**Cut-off Date**").

The said notice is also available on the website of the Company: www.juniperhotels.com, BSE Limited ("**BSE**"): www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited ("**NSE**"): www.nseindia.com and on the website of National Securities Depository Limited ("**NSDL**") www.evoting.nsdl.com.

In accordance with the provisions of the MCA Circulars, Members can vote only through e-voting process. The voting rights of the members shall be reckoned on the basis of the equity shares of the Company held by them as on the Cut-off Date. Any person who is not a shareholder of the Company as on the Cut-off Date shall treat the Postal Ballot notice for information purposes only.

The Company has engaged the services of National Securities Depository Limited ("**NSDL**") for the purpose of providing e-voting facility to all its members. The e-voting facility shall commence on Tuesday, June 4, 2024 at 09:00 a.m. (IST) and end on Wednesday, July 3, 2024 at 05:00 p.m. (IST) . The e-voting facility will be disabled by NSDL immediately thereafter and will be disallowed thereafter.

In case of any queries, you may refer the Frequently Asked Questions (FAQs) for Shareholders and e-voting user manual for Shareholders available at the download section of www.evoting.nsdl.com or call on: 022 - 4886 7000 or send a request to evoting@nsdl.com

For **Juniper Hotels Limited**
Sd/-
**Sandeep L. Joshi**
Company Secretary

June 03, 2024
Mumbai, India



Govt of Mizoram | राजश्री लॉटरी Government Lottery | Govt of Goa

मे 2024 मध्ये विजेत्यांनी जिंकले

₹4,66,97,650

Govt of Goa | राजश्री 100

पहिले बक्षीस ₹35,00,000

तिकीट ₹100/-

ड्रॉ दिनांक 06.06.2024

Book Now At: bookmyrajshree.com

रिजल्ट साठी नवाकाळ पेपर पहा



CEAT

**सीएट लिमिटेड**

**सीआयएन:** एल२५१००एमएच१९५८पीएलसी०११०४१

**नोंदणीकृत कार्यालय:** ४६३, डॉ. ॲनी बेसेंट रोड, वरळी, मुंबई - ४०० ०३०

**फोन:** +९१ २२ २४९३ ०६२१; **फॅक्स:** +९१ २२ २४९३ ८९३३

**ईमेल:** investors@ceat.com; **वेबसाइट:** www.ceat.com

**सूचना**

**कंपनीच्या समभागाचे इनव्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) डिमॅट खात्यात हस्तांतरण**

कंपनी कायदा, २०१३ (''अधिनियम'') च्या कलम १२४ मधील इतर बाबींच्या तरतुदींनुसार, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम २०१६ नुसार, अधिसूचित केल्याप्रमाणे आणि वेळोवेळी सुधारित केल्यानुसार सूचना याद्वारे देण्यात आली आहे आणि असे इतर लागू नियम आणि नियम (एकत्रितपणे ''आयईपीएफ नियम'' म्हणून संबोधले जाते), कंपनीचे ते इक्विटी शेअर्स आयईपीएफकडे हस्तांतरित करण्याच्या संदर्भात, ज्याच्या संदर्भात सलग ७ (सात) वर्षे किंवा त्याहून अधिक लाभांश राहिला आहे किंवा भागधारकांनी न भरलेला किंवा दावा न केलेला आहे.

त्यानुसार, ज्यांचे समभाग वित्तीय वर्ष २०२४-२५ दरम्यान आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यास पात्र आहेत अशा सर्व संबंधित भागधारकांना वैयक्तिक संप्रेषण पाठविले गेले आहे आणि त्यांना शुक्रवार, दि. ऑगस्ट ३०, २०२४ पर्यंत किंवा त्यापूर्वीच्या वित्तीय वर्ष २०१६-१७ पासून आजपर्यंत अशा हक्क सांगितलेल्या लाभांशाचा दावा करण्याची विनंती आहे. अशा भागधारकांचे तपशील आणि समभाग कंपनीच्या वेबसाइट www.ceat.com वर ''शेअरहोल्डर इन्फॉर्मेशन'' कलमांतर्गत अपलोड केले गेले आहेत. भागधारकांना आयईपीएफ खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यासाठी पात्र समभागाकरिता वेबसाइटवर अपलोड केलेल्या तपशीलाचा संदर्भ घेण्याची व त्याची पडताळणी करण्याची तसेच वित्तीय वर्ष २०१६-१७ पासून त्यांच्या लाभांशाच्या हक्कावर दावा करण्यासाठी अर्ज करून व सदर अर्ज कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजन्ट (आरटीए) एनएसडीएल डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड यांना ४था मजला, टॉवर ३, वन इंटरनॅशनल सेंटर, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ दूरध्वनी: ०२२-४९१४२५७८/२६३६, ईमेल आयडी: investor.ndmlrta@ndml.in येथे शुक्रवार, दि. ऑगस्ट ३०, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी पाठवण्याची विनंती करण्यात येत आहे.

शुक्रवार, दि. ऑगस्ट ३०, २०२४ पर्यंत कंपनीला संबंधित भागधारकांकडून कोणताही संदेश प्राप्त न झाल्यास, आयईपीएफ नियमांवली नुसार देण्यात आलेल्या प्रक्रियेचे पालन करून कंपनीला वित्तीय वर्ष २०१६-१७ ची न हक्क सांगितलेली लाभांश रक्कम आणि परिणामी त्यावरील सादर समभाग कोणतीही पूर्व सूचना न देता आयईपीएफकडे हस्तांतरित करणे बंधनकारक असेल.

संबंधित भागधारक, ज्यांचे स्वतःचे भौतिक समभाग आहेत आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ डिमॅट खात्यात हस्तांतरित करण्यास पात्र आहेत, यांनी नोंद घ्यावी की कंपनी, आयईपीएफमध्ये हस्तांतरणासाठी ठेवलेल्या मूळ समभागांच्या प्रमाणपत्रांऐवजी नवीन समभाग प्रमाणपत्र जारी करेल. भागधारकांद्वारे ठेवलेले मूळ सामायिक केलेले प्रमाणपत्र निरस्त केले जाईल आणि नॉन-नेगोशिएबल मानले जाईल. आयईपीएफ नियमांनुसार आयईपीएफ खात्यात समभाग हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने नवीन समभाग प्रमाणपत्र देण्याबाबत कंपनीने त्यांच्या वेबसाइटवर अपलोड केलेल्या तपशीलांचा विचार समभागधारकांना करावा लागेल आणि समभागधारकांना याची नोंद घ्यावी लागेल. संबंधित भागधारकांनी डिमटेरियलाइझ फॉर्म मधे असलेल्या समभागांच्या संदर्भात कंपनी आयईपीएफ खात्यात ही समभाग हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक अशी प्रक्रिया प्रारंभ करेल.

समभागधारक देखील नोंद घेऊ शकतात की अशा समभागांवर जमा झालेल्या सर्व फायद्यांसह हक्क न सांगितलेले लाभांश आणि हक्क न सांगितलेले समभाग, आयईपीएफ नियमांनुसार विहित केलेल्या प्रक्रियेनंतर आयईपीएफकडे एकदा हस्तांतरित झाल्यास आयईपीएफ प्राधिकरणाकडून दावा केला जाऊ शकतो आणि अशा हस्तांतरणानंतर कंपनीच्या विरोधात कोणताही दावा राहणार नाही.

पुढील कोणत्याही प्रश्नांसाठी किंवा विनाअनुदानित लाभांश आणि/किंवा हक्क न सांगितलेल्या समभागाचा दावा करण्यासाठी किंवा तुम्हाला काही माहिती/स्पष्टीकरण हवे असल्यास कृपया एनएसडीएल डेटाबेस मॅनेजमेंट लिमिटेड यांना ४था मजला, टॉवर ३, वन इंटरनॅशनल सेंटर, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ दूरध्वनी: ०२२-४९१४२५७८/२६३६, ईमेल आयडी: investor.ndmlrta@ndml.in

**सीएट लिमिटेड करिता**
**सही/-**
**कुमार सुब्बिया**
**मुख्य वित्तीय अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**तारीख : जून ३, २०२४**

RPG

